# कायम विना अनुदान तत्वावरील माध्यमिक शाळा परवानगीचे आदेश

## महाराष्ट्र शासन

क्रमांक: नमाशा १००५/(३०८ /२००५) /माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ८ सप्टेंबर,२००५

प्रति,
विभागीय शिक्षण उपसंचालक,
बृहन्मुंबई /पुणे/ लातूर

विषय:- २००५-२००६ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग,क्रमांक-एसएसएन-२१०३/(५०/०३)/माशि-२,दिनांक २७ मे,२००३.

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन खालील शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून सन २००५-२००६ या शैक्षणिक वर्षापासून **कायम विना अनुदान** तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशाद्वारे शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र | संस्थेचे नांव | ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | [illegible] वागळे इस्टेट, ठाणे | वागळे इस्टेट , ठाणे | इंग्रजी | ८वी |
| २ | एस.वाय.एम.ट्रस्ट,मयेकर वाडी, मयेकर वाडी , विरार (प).ता.वसई . जि.ठाणे | मयेकर वाडी, विराट नगर, विरार (प) .जि.ठाणे | मराठी | ८वी |
| ३ | तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशिय संस्था, पानगांव, ता.कळंब | हावरगांव, ता.कळंब, जि.उस्मानाबाद | मराठी | ८वी |
| ४ | पूना शिक्षण संस्था , कावेरीनगर फाटा, थेरगांव, पुणे-३३ | रहाटणी काळेवाडी, ता .हवेली, जि.पुणे | हिंदी | ८वी |
| ५ | रोझरी इं एज्यु.१४,डॉ.आंबेडकर रोड, पुणे | विमाननगर , पुणे- १४ | इंग्रजी | ८वी |
| ६ | रोझरी इं एज्यु.१४,डॉ.आंबेडकर रोड, पुणे | साळुंखे विहार रोड, कोंढवा, पुणे-४० | इंग्रजी | ८वी |

२. सदर संस्थेस माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.:-

(१) या नवीन माध्यमिक शाळांना कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून, भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

(२) संदर्भ माध्यमिक शाळांनी शासनाचा वेळोवळी निघणाऱ्या आदेशांचे माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २७ मे,२००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

प्रधानाचार्य
श्रीमती सावित्रीबाई रामेश्वर पाल
हिन्दी हायस्कूल, श्रीनगर, रहाटणी
पुणे-[illegible]

(४) संस्थेच्या अध्यक्षाकडून कायम विना अनुदान तत्वावर माध्यमिक शाळा चालविण्यास तयार असल्याबाबतचे शपथपत्र घेऊन स्वतंत्रपणे जतन करुन ठेवावे.

(५) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

(६) "कायम विना अनुदान तत्वावर परवानगी मिळालेली शाळा" असा फलक शाळेने ठळक अक्षरात दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा त-हेने लावणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील.

(७) सदर कायम विना अनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने संबंधित अधिका-यांशी / शासनाशी पत्रव्यवहार करतांना " कायम विनाअनुदानित शाळा" अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

(८) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे (उदा.विद्यार्थ्यांच्याप्रवेशाबाबत) काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन,संबंधित नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) सदर संस्थे मार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालु नाही.

३) " कायम विना अनुदान " तत्वावरील शाळेच्या नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.

४. विहित शर्तींची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच माध्यमिक शाळांना परवानगी दिली जाईल, अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी घ्यावी.

परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबत अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

(मो.आ.गुड्डे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:

शिक्षण संचालक,(माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे

शिक्षणाधिकारी , जि.प. यवतमाळ,

शिक्षण निरिक्षक (पश्चिम),बृहन्मुंबई

मा.शालेय शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव

मा.शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

निवड नस्ती, माशि-१.

प्रधानाचार्य
श्रीमती सावित्रीबाई रामेश्वर पाल
हिन्दी हायस्कूल, श्रीनगर, रहाटणी
पुणे-४११०१७

C:\ASHARMA\FORMAT NON GRANT 305-05